नि.दि.दा.क्र. १०९२/२०२२
इंद्रसेन वि. बापुराव

## निशाणी क्र. २३ वरील आदेश

प्रतिवादी क्र.४ ने प्रस्तुत अर्ज जबाबदावा दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून जबाबदावा दाखल करण्यासाठी केला आहे. प्रतिवादी क्र.४ चे कथन असे की, दाव्याची कैफियत हजर होवून मुदतीमध्ये दाखल करणे आवश्यक होते, परंतु अपरिहार्य कारणामुळे तसेच आवश्यक कागदपत्रे न मिळाल्यामुळे ते न्यायालयात हजर होवून वेळेत त्यांची कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादीचे म्हणणे मागविण्यात आले परंतू वादीने म्हणणे दाखल न केल्यामुळे प्रस्तुता अर्ज त्यांचे विनाम्हणणे चालविण्यात आला.

३. अर्जाचे अवलोकन केले. वादीने दावा नोंदणीकृत खरेदीखत रद्द करून मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी सदर दाव्यात हजर झाले आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीचे हित गुंतल्याचे दिसते. प्रतिवादी त्यांची कैफियतीद्वारे त्यांचे म्हणणे देऊ इच्छित आहेत. परंतु कैफियत दाखल करण्यास प्रतिवादीस विलंब झालेला आहे. सबब सदर विलंबासाठी प्रतिवादीवर खर्च बसवणे आवश्यक आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याच्या दृष्टीकोनातून प्रतिवादीचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित ठरेल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज निशाणी क्र. २३ खर्च रक्कम रुपये १००/- वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र.४ विरुध्द झालेला विनाजबाब आदेश रद्द करण्यात येतो.
३. प्रतिवादी क्र.४ यांनी सदरची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांचा जबाब दावा अभिलेखावर घेण्यात यावा.

AMRUTA CHARUDATTA JOSHI
Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2025.02.01 17:26:57 +0530

(अमृता चा. जोशी)
२रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, कळंब.

दिनांक ०१/०२/२०२५

नि.दि.दा.क्र. १०९२/२०२२
इंद्रसेन वि. बापुराव

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | Mr. D. B. Nikam Stenographer-III, |
| Court Name | : | Smt. A.C.Joshi, 2nd. Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Kallam. |
| Order/Judgment date | | 01-02-2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 01-02-2025 |
| Order uploaded on | : | 04-02-2025 |